# तो हलकाच



मेणबत्त्या पेटवत राहिल्या
तरी ती जळतच आहे
तिला कोण जाळतो
त्यावरून मेणबत्तीचं जळणं
ठरतं आहे

ती जळते धृतराष्ट्राच्या दरबारात
दुर्योधनाच्या दराऱ्यात
राजाश्रायात
ती जळते
माध्यमांच्या कोलाहलात
राजगृहात

पेटवल्या नाहीत मेणबत्त्या
म्हणून आग थोडीच विझणार ?
आगीची झळ लागून मात्र
मेण, बत्ती नसली तरी वितळणार

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/